## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १९७१अ/२०२२

**तक्रारकर्ता, श्री.मारुती भट्टगिरी**
कार्यालय क्र.०७ बी, १५, अमर छाया इमारत,
सेक्टर ७, शांतीनगर, मिरारोड पूर्व
जि.ठाणे ४०१ १०७.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका,
खारी तलाव मराठी शाळा क्र.६, दुसरा माळा,
भाईंदर पूर्व, ता.जि.ठाणे ४०१ १०५.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका,
खारी तलाव मराठी शाळा क्र.६, दुसरा माळा,
भाईंदर पूर्व, ता.जि.ठाणे ४०१ १०५.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २६.०३.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २७.१०.२०२१ | -- | २८.११.२०२१ | १८.१२.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. २८.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून शासकिय अधिकारी यांना माहिती देण्यास सांगून सुध्दा अपेक्षीत असलेली माहिती मिळत नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २६.०३.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.लालनाथ चकोर, क्षयरोग अधिकारी, प्रभाग क्र.३ यांचे प्रतिनिधी श्री.निखिल मेश्राम, लिपिक, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" सन २०१७ ते आजपर्यंत प्रभाग ३ मध्ये झालेल विवाह नोंदणी/मॅरेज रजिस्टेशन या संदर्भात दिलेले कागदपत्र याची माहिती मिळावी. उदा: अर्ज, पंचनामा, छाया चित्र, नोंदणी फी व इतर संबंधित माहिती देण्यात यावे व इन्सपेक्शन करण्यात यावे. महासभा ठराव शासन. "*

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी असे नमूद केले की, तत्कालीन प्रभाग अधिकारी श्री.दामोदर संखे (सेवानिवृत्त) यांनी अर्जदार यांस विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे अभिलेख अवलोकन केले असता दिसुन येत आहे. तद्नंतर अर्जदार यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर तक्रारकर्ता यांनी अपेक्षिलेली माहिती तत्कालीन प्रभाग अधिकारी श्री.दामोदर संखे (सेवा निवृत्त) यांनी स्पीडपोस्टद्वारे देण्यात आलेली असल्याचे दिसून येत आहे. तद्नंतर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी प्रथम अपिलाबाबत सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी माहिती मिळाली नसल्याने प्रथम अपिल दाखल केल्याचे निवेदन केले होते. सुनावणीबाबतचे निर्णय पारीत होण्याच्या आधी तत्कालीन प्रभाग अधिकारी श्री.दामोदर संखे (सेवा निवृत्त) यांनी "माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (त्र) नुसार तसेच महाराष्ट

शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१२९८९/प्र.क्र.४७९/सहा.मंत्रालय मुंबई दि.१७/१०/२०२४ नुसार वैयक्तीक स्वरुपाची माहिती देता येत नाही. असे RPAD च्या पोस्टने कळविले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१८.१२.२०२१ रोजी आदेश पारित करुन, जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी/प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.३ यांनी तक्रारकर्ता यांस विवाह नोंदणी/मॅरेज रजिस्ट्रेशन बाबत रजिस्टरच्या छायांकित प्रती १५ दिवसात विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात याव्यात. असे आदेश पारित केले आहेत. त्यानंतर तक्रारकर्ता यांना कोणतीच माहिती देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना असे कळविले होते की, मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर पूर्व प्रभाग समिती क्र.३ च्या कार्याक्षेत्रातील सन २०१७ ते आजपर्यंत विवाह नोंदणी/ मॅरेज रजिस्ट्रेशन बाबतची माहिती आपण सदर अर्जाद्वारे अपेक्षिलेली आहे. त्याअनुषंगाने इकडील कार्यालयामार्फत सन २०१७ ते आजपर्यंत ८९९ विवाहनोंदणी रजिस्ट्रेशन केलेले आहे व त्याची यादी तक्रारकर्ता यांना पाठविलेली आहे. तद्नंतर दि.१५.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी हे असे कळवितात की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (त्र) नुसार मागणी केलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने, देता येत नाही. आधी तक्रारकर्ता यांना माहिती देऊन, त्यानंतर ती देता येत नाही, असे कळविणे. अशा प्रकारचा विरोधाभास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी का केला? तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर तक्रारकर्ता यांना माहिती का दिली नाही? याबाबत त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दामोदर संखे, सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांनी तक्रारकर्ता यांना आधी माहिती देऊन, त्यानंतर ती देता येत नाही. असे का कळविले? अशा प्रकारचा विरोधाभास त्यांनी का केला? तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर त्यांनी तक्रारकर्ता यांना का माहिती दिली नाही? याबाबतचा लेखी स्वरुपातील खुलासा त्यांनी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांचेवर दंडात्मक आदेश केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२८.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ मार्च, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दामोदर संखे, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका, खारी तलाव मराठी शाळा क्र.६, दुसरा माळा, भाईंदर पूर्व, ता.जि.ठाणे ४०१ १०५.

**– यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका,
खारी तलाव मराठी शाळा क्र.६, दुसरा माळा,
भाईंदर पूर्व, ता.जि.ठाणे ४०१ १०५. **यांचे मार्फत रवाना.**